सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, 2231715 http://ycmou.ac.in, http://ycmou.digitaluniversity.ac

e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

**नोंदणी कक्ष**

जा.क्र. : यचममुवि/वि.से.वि/२०२४/284 दि: २९/१०/२०२४

**बी.एड (सेवांतर्गत) प्रवेशेच्छूक अध्ययनार्थींना प्रवेश अर्ज कागदपत्र पडताळणी संदर्भातील सूचना**

नमस्कार,

सर्व बी.एड. प्रवेशेच्छुक अध्ययनार्थींना कळविण्यात येते की, आपण बी.एड. प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्जात भरलेल्या माहितीच्या आधारे, उमेदवारांच्या जिल्हानिहाय कागदपत्र पडताळणी याद्या (Documents Verification List) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. ज्या जिल्ह्यातून आपण अर्ज केला आहे, त्या जिल्ह्याच्या प्रवेश अर्ज व कागदपत्र पडताळणीसाठी दिलेल्या नियोजित तारखेला आपण मूळ कागदपत्र व एका छायांकित प्रतीच्या संचासह सकाळी ठीक १०.०० वा. त्या-त्या जिल्ह्याच्या विभागीय केंद्रावर उपस्थित रहावे.

दिव्यांग उमेदवारांना स्वतः उपस्थित राहता येत नसल्यास, अन्य व्यक्तीला तसे अधिकार पत्र देऊन आपल्या मूळ कागदपत्रांसह अर्ज व कागदपत्र पडताळणीसाठी संबंधित विभागीय केंद्रावर नियोजित दिवशीच पाठविणे बंधनकारक आहे. बी.एड. प्रवेश २०२४-२६ तुकडीसाठी अनुभवाची अंतिम दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत निश्चित करण्यात आलेली आहे, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कागदपत्रे पडताळणीसाठी पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक/अनिवार्य आहे.**

१) बी.एड. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरलेल्या प्रवेशेच्छुकांनी माहितीपुस्तिकेतील **'परिशिष्ट - २'** आणि ऑनलाइन प्रवेश अर्जासह कागदपत्र पडताळणीसाठी विभागीय केंद्रावर नियोजित दिवशी दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२) उमेदवाराने आपल्या प्रवेश अर्जाची छापील प्रत व प्रवेश अर्ज भरतेवेळी वापरलेला User Id व Password आणावा, त्याशिवाय आपल्या अर्जाची पडताळणी होणार नाही.

३) ऑनलाईन प्रवेश अर्ज व कागदपत्रांची पडताळणी केलेले बी.एड. प्रवेश अर्ज, सन २०२४-२६ तुकडीसाठीची गुणवत्ता यादीसाठी व प्रवेशासाठी ग्राह्य धरले जातील.

४) विभागीय केंद्रामार्फत बी.एड. प्रवेश अर्ज पडताळणी (Documents Verification) न करणारे उमेदवार सन २०२४-२६ तुकडीच्या प्रवेश प्रक्रियेतून बाद होतील.

५) प्रवेश अर्ज पडताळणी करताना उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी समितीला प्रवेश अर्जात भरलेल्या माहितीचे मूळ पुरावे सादर करणे बंधनकारक असेल. **(पुरावे सादर करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार**



AnyScanner

**नाही. त्यात कोणत्याही स्वरूपाच्या नवीन माहितीची भर घातली जाणार नाही.)** याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) विभागीय केंद्रावर प्रवेश अर्ज पडताळणी दरम्यान शांतता राखावी. कोणत्याही प्रकारचा गोंधळ गोंगाट निर्माण होणार नाही, याची काळजी घेवून समितीला पूर्णपणे सहकार्य करावे.

७) कागदपत्र पडताळणी समिती कक्षात फक्त उमेदवारांनाच प्रवेश करता येईल. उमेदवारांशिवाय अन्य नातेवाईकांना पडताळणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

८) उमेदवारांनी प्रवेश समितीवर कोणत्याही प्रकारचा दबाव, धमकी, जबरदस्ती, मारहाण, अपशब्द वापर, वाद घालणे, दस्तऐवज चोरणे, सरकारी कार्यालयात गोंधळ अथवा अनधिकृत जमाव केल्यास भारतीय दंड संहितेनुसार (IPC) कार्यवाहीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

९) अर्ज पडताळणी शक्यतो यादीत दिलेल्या क्रमाने करण्यात येईल. परिस्थितीनुसार विभागीय संचालक त्यात बदल करु शकतील व तो बदल सर्व उमेदवारांना बंधनकारक असेल.

१०) प्रवेश अर्ज कागदपत्रे पडताळणीसाठी समिती असेल. ती समिती प्रत्येक प्रवेशार्थीची वैयक्तिक माहिती, संपर्क माहिती, शैक्षणिक अर्हता, शिक्षक म्हणून नियुक्ती आदेश, अध्यापनाचा एकूण सेवा अनुभव व समांतर / सामाजिक आरक्षण इ. तपशीलासंदर्भात सर्व माहिती उमेदवाराने सादर केलेल्या मूळ कागदपत्रांच्या आधारे तपासणी करतील. त्या संदर्भातील सर्व मूळ कागदपत्रे व एक फोटोकॉपी (छायांकित) संच ठेवावा. फोटोकॉपी (छायांकित) संच, तुमचा प्रवेश अर्ज तपासणी नंतर तुमच्या ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत समितीकडे द्यावयाचा आहे .

११) जर आपण आपल्या जिल्ह्याच्या दिनांकाला कागदपत्र पडताळणीसाठी वैद्यकीय, तांत्रिक व शासकीय कारणामुळे उपस्थित राहू शकणार नसाल, तर आपले मूळ कागदपत्रासह व आपण कागदपत्र पडताळणीसाठी दिलेल्या अधिकार पत्रासह आपले अधिकार प्राप्त व्यक्तीला संबंधित दिनांकाच्या दिवशी विभागीय केंद्रावर मूळ कागदपत्रासह उपस्थित राहून आपल्या कागदपत्रांची पडताळणी करता येईल, मात्र याची सर्वस्वी जबाबदारी आपली स्वत:ची असेल, याची नोंद घ्यावी.

**अपेक्षित कागदपत्रे :**

(क) ऑनलाईन संगणकीय मूळ अर्जाची प्रत.

(ख) शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या मूळ व सत्यप्रती

(ग) प्रवेश अर्जात नोंद केल्याप्रमाणे प्रत्येक शाळेतील सुरूवातीपासून पुढील सर्व नेमणूकीच्या आदेशांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती अनुभवाचे दाखले.

(घ) मागासवर्गीय असल्यास पुढे नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत-

* **अनुसूचित जाती** (SC) - जातीचा दाखला
* **अनुसूचित जमाती** (ST) - जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र
* **विमुक्त जमाती भटक्या जाती इतर मागासवर्गीय/विशेष मागासवर्गीय - (VJ/NT/OBC/SBC)** जातीचा दाखला, ऑनलाईन संगणकीय अर्जात नमूद केलेल्या नावाचे वैध कालावधीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.
* आर्थिक दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाच्या उमेदवारांना शासन नियमानुसार वेळोवेळी निर्देशित केलेली प्रमाणपत्रे / दाखले / दस्ताऐवज



AnyScanner

* SEBC साठी सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

(च) उमेदवाराने प्रवेश अर्ज कागदपत्रे तपासणी करताना (**माहितीपुस्तिकेतील परिशिष्ट क्र. २**) आपण केलेल्या सेवेचा तपशील वरील तक्त्यात भरून प्रवेश अर्जासोबत जोडावा.

(छ) बी.एड. प्रवेश अर्ज कागदपत्रे पडताळणी करताना बी.एड. प्रवेश माहितीपुस्तिकेतील दिलेल्या महानगरपालिका आयुक्त / गट शिक्षणाधिकारी / शिक्षणाधिकारी / जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी / मुख्याध्यापक / संस्था प्रमुख आश्रम शाळा असल्यास प्रशासन अधिकारी यांनी प्राथमिक शिक्षकांना दिलेले शिफारस प्रमाणपत्र पडताळणीस येताना प्रत्येक उमेदवारांनी भरून आणणे अनिवार्य आहे. त्याची फोटो प्रत ग्राह्य धरली जाणार नाही. **(माहितीपुस्तिकेतील परिशिष्ट क्र.-४)**

(ज) जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कोणत्याही प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

(झ) सर्व सेवेचे नेमणूक आदेश, शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालक यांच्या शिक्षक किंवा पदमान्यता पत्राच्या सुरूवातीपासूनच्या सर्व साक्षांकित प्रती, शाळा मान्यता पत्र.

(ण) शाळा अनुदानित असेल तर वर्षनिहाय शाळा तपासणी अहवालाच्या साक्षांकित प्रती.

(ट) सेवापुस्तिकेतील संबंधित नोंदी (संपूर्ण सेवापुस्तिकेची साक्षांकित केलेली फोटोकॉपी)

(ठ) नावात बदल असल्यास नाव बदल पुरावा म्हणून राजपत्र.

**महत्वाचे :**

आपण नोंदवलेल्या अध्यापन अनुभवाचा पुरावा म्हणून आपली मूळ सेवापुस्तिका/सेवा ऑर्डर/इन्स्पेक्शन रिपोर्ट इ. पैकी किमान एका मूळ दस्ताऐवजाची प्रत तुमच्याकडे असणे बंधनकारक आहे समितीला मूळ कागदपत्र तपासताना शंका निर्माण झाल्यास, त्या मुद्यांसंदर्भात दुसऱ्या पुराव्याची मागणी समिती करेल. त्यावेळी तात्काळ तुम्ही तो सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सेवा पुस्तिका व सेवा आदेशाच्या सर्व प्रती सोबत ठेवाव्यात.

११) आरक्षणाचा फायदा घेणाऱ्या उमेदवाराकडे शासन नियमानुसार जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व ना सायस्तर (नॉन क्रिमीलेयर) दाखला इ. शासन नियमानुसार आवश्यक ते दस्तऐवज असणे बंधनकारक आहे.

१२) सामाजिक आरक्षणासंदर्भात लाभ घेणाऱ्या उमेदवारांकडे खालील पुरावे असावेत.

* **दिव्यांग** : दिव्यांग असल्याबाबतचे शासन निर्णयानुसार सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (जिल्हा शल्य चिकित्सक)

* **प्रकल्पग्रस्त** : जिल्हा पुनर्वसन अधिकारी/सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्रमाणपत्र, परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.

* **आपत्तीग्रस्त** : उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांचे प्रमाणपत्र. परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.

* **स्वातंत्र सैनिक पाल्य :** सैनिकाचा पत्नी/मुलगा/अविवाहित मुलगी यांनी स्वातंत्र सैनिकाच्या ओळखपत्राची प्रत व पाल्याच्या नातेसंबंधाचा पुरावा.

* **आजी/माजी सैनिक पाल्य :** सैनिकाची पत्नी/मुलगा/अविवाहित मुलगी यांनी जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र आवश्यक नातेसंबंधाचा पुरावा, डिस्चार्ज पुस्तक आवश्यक.

* **विधवा** : महानगरपालिका/नगरपालिका/ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त झालेले पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.



AnyScanner

* **घटस्फोटीता** : विवाहनोंदणी दाखला किंवा न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश किंवा मुस्लीम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी/इमामांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र. ते प्रमाणपत्र नोटरी करून मराठी भाषेत भाषांतर करून आणणे आवश्यक.

* **गोवा, बेळगाव, बिदर** : हा मराठी भाषिक प्रदेश असल्याने या उमेदवारांनी नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत आणावे व त्यावर संबंधित अधिकारी/मुख्याध्यापकाची सही व शिक्का आणणे अनिवार्य आहे. प्रवेश अर्ज पडताळणी वेळी वरील मूळ व साक्षांकित प्रमाणपत्राआधारे आपल्या प्रवेश अर्जातील माहितीची सत्यता पडताळून पाहण्यात येईल. त्यामुळे उपरोक्त आवश्यक ती कागदपत्रे तुमच्या जवळ नसल्यास, ऑनलाईन प्रवेश अर्जातील माहितीत बदल करण्यात येतील.

१३) प्रवेश अर्जातील कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर पुढील प्रवेश सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. त्या सूचना पाहणे व त्याप्रमाणे कार्यवाही करणे ही उमेदवारांची जबाबदारी राहील.

१४) अद्ययावत माहितीसाठी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळाला भेट देत राहावी व अधिक माहितीसाठी बी. एड. माहितीपुस्तिका वाचावी.

१५) कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर, आपल्याला पुढीलपैकी दोन अध्यापन पद्धतींची निवड करावयाची आहे, ती समिती सदस्यांना सांगावयाची आहे. त्यांनी अध्यापन पद्धतीची योग्य नोंद केलेली आहे का ? ह्याची खातरजमा करण्याची जबाबदारी प्रवेशार्थींची असेल.

| | | |
|---|---|---|
| १) EDU 405 : मराठी ☐ | २) EDU 406 : हिंदी ☐ | ३) EDU 407 : इंग्रजी ☐ |
| ४) EDU 408 : संस्कृत ☐ | ५) EDU 409 : इतिहास ☐ | ६) EDU 410 : भूगोल ☐ |
| ७) EDU 411 : गणित ☐ | ८) EDU 412 : विज्ञान ☐ | ९) EDU 413 : अर्थशास्त्र ☐ |
| १०) EDU 414 : हिशोबशास्त्र ☐ | | |

संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक

संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग



AnyScanner